Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# मानवी जीवनासाठी पर्यावरणाचे रक्षण

**सुनिता रामचंद्र क्षिरसागर,**
**छात्राध्यापक (एम्. फिल्.),**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**

पर्यावरण संरक्षण ही २१ व्या शतकातील काळाची गरज आहे. हे सर्वमान्य व सर्वविद आहे. या पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टिनेजागतिक पातळीवर प्रत्येक देशाचे सरकार व स्वयंसेवी संस्था प्रयत्नशील आहेत. पर्यावरण संरक्षणाच्या हेतुने १९९४ चीनमध्ये ‘ निसर्गमित्र’ ही संस्था सर्व प्रथम कार्यरत झाली, तर इस्त्राईल मध्ये जीवन व पर्यावरण यासारख्या संस्था कार्यरत आहेत. अशाच प्रकारचे प्रयत्न भारतातही केले जात आहेत.भारतीय राज्यघटनेत पर्यावरण सुरक्षासंबंधी तरतूद केली आहे. त्यामंध्ये भारतातील सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे. राष्ट्राविकासासाठी प्रयत्न करणे व हा प्रयत्न करत असताना राजकीय,धार्मिक,भेदाभेद टाळणे,व हिसाचार न करणे,वन्यजीव तळी, नदया या पर्यावरणीय घटकांचे संरक्षण करणे अभिप्रेत आहे.म्हणजेच पर्यावरण संरक्षण मानवी संरक्षणाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहे.

**पर्यावरण संरक्षण /सुरक्षितता :**

पर्यावरण संरक्षणदृष्टिने जागतिक स्तरावर UNESCO,UNC,UNEP, UNDP, WHO, WWF या संस्था प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी कार्यरत आहेत. भारताच्या दृष्टीने विचार केल्यास १८५३ साली सर्व प्रथम समुद्र किनारा उपद्रव कायदा असित्वात आला. परंतु या कायदयाच्या अंमलबजावणीबाबत मात्र संभ्रमावस्था निर्माण झाली.इ.स. १९७६ च्या ४२ च्या घटनादूरुस्तीमध्ये पर्यावरण संरक्षण विषयक कायदा करण्यासाठी प्रयत्न झाले व पर्यावरण संरक्षणाचा कायदा प्रत्यक्षपणे १९८६ मध्ये अस्तित्वात आला पर्यावरण संरक्षण विषयक कायदा संमत होण्यासाठी यापूर्वीचे म्हणजे १९७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा व १९८१ चा हवा कायदा हे कायदे पुर्वसूरी ठरले.

फक्त शासकीय धारणाच्या माध्यमातून नव्हे, तर मानवी नैतिक कर्तव्याच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचे नियोजन खालील प्रमाणे करता येईल.

पर्यावरण सुरक्षिततेसाठी संरक्षणाचे नियोजन →

- हवा संरक्षण
- जल संरक्षण
- ध्वनी तीव्रतेपासुन संरक्षण
- मृदा संरक्षण
- प्राणी संरक्षण
- ऊर्जा संरक्षण

**हवा संरक्षण :**

१) वृक्षाची लागवड करणे.

२) सार्वजनिक ठिकणी धुम्रपानावर बंदी आणणे.

३) कारखाण्यांची धुराडे अधिक उंचीवर असावीत.

४) धुर उंच हवेत साडण्यासाठी चुलीवर धुराडयांची रचना असावी.

५) वाहनाच्या प्रदूषणाचे (PUC)काटेकोरपणे पालन करणे.

६) तंत्राज्ञानाचा उदयोगात वापर करुन प्रदुषणनियंत्रण करणे.

७) Catatytic Converterचा वाहनात वापर करणे.

८) सौरशक्तीचा वापर अधिक वाढविणे.

**जल संरक्षणः**

१) पाणी बचतीचे महत्व पटवून देणे.

२) बागेला अगदी सकाळी किंवा संध्याकाळी पाणी घालावे.

३) जलप्रदुषणावर अधारित काव्यवाचन, निबंधस्पर्धा, चित्रकलास्पर्धा यांचे आयोजन करावे.

४) शेतात रासायनिक खंताऐवजी सेंद्रिय खंताचा अधिक वापर करणे.

५) शहरी सांडपाण्याचा उपयोग वृक्षसंवर्धनासाठी करणे.

६) पाण्याच्या पुनर्वापर विषयक नविन तंत्रज्ञान विकसित करणे.

७) जल संरक्षणविषयक जनजागृती करणे.

**ध्वनी तीव्रतेपासून संरक्षणः**

१) रेडिओ टी.व्ही यांचा आवाज नियंत्रित ठेवणे व वापर झाल्यानंतर तात्काळ बंद करणे.

२) विनाकारण हॉर्न वाजविणे,कर्कश हॉर्नचा वापर करणे यावर बंदी घालणे.

३) आवाज कमी असणारी घरगुति साधणे व वाहनांचा वापर करणे.

४) शाळा ,निवासाची ठिकाणे वाहतूकिच्या ठिकाणापासून दुर असावीत.

५) प्रसारमाध्यमातुन ध्वनीप्रदूषणाचे नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न करणे.

६) ध्वनी प्रदुषण विषयक कडक कायदयांची अंमलबजावणी करणे.

**मृदा संरक्षण :**

१) घरातील ओल्या कचऱ्यातील गांडुळखत /खत तयार करावे.

२) शेतीखद्वारे उत्पादित अन्नपदार्थ निर्माण करताना सेंद्रिय शेतीचा अवलंब करावा.

३) अध्ययनार्थींनी गटा-गटाने मातीचे डोंगर,प्रतिकृतीचा तयार कराव्यात.

४) अध्ययनार्थीने मृदेची धुप होण्याने होणाऱ्या दुष्परिणामाविषयी माहीती गोळा करणे.

५) एक विदयार्थि एक वृक्ष असा प्रकल्प राबविणे.

६) प्रदुषण विषयक कायदयांची कडक अंमलबजावणी करणे .

७) माती परीक्षण करण्यासाठी शेतकऱ्याना ज्ञान व प्रेरणा देणे.

**प्राणी संरक्षणः**

१) पर्यावरणवादी संस्थेचे सभासद होण्यासाठी विदयार्थ्यांना माहिती व प्रेरणा देणे.

२) बाबा आमटे सारख्या प्राणी मित्रांचे आदर्श घालुन देंणे.

३) प्राणी संग्रालयास भेटी देणे .उदा. पुणे शहरातील, कात्रज उदयान.

४) भारतातील वा महाराष्ट्रातील राष्ट्रीय उदयाने, अभायारण्याची माहिती मिळविणे.

५) प्राणी संरक्षण विषयक विविध कायदे व नियमांची माहिती सर्वसामान्य व्यक्तिपर्यत पोहचविणे.

६) प्राणी संरक्षणच्या दृष्टीने वृत्तपत्र, दिवाळी अंक ,मासिके,त्रैमासिके शोधनिबंध ,पर्यटन मार्गदर्शिका यांमधुन लेखन करणे.

**उर्जा संरक्षण :**

१) घरगुती ऊर्जा साधनांचा काटकसरीने वापर करणे.

२) खोली बाहेर पडण्यापूर्वी पंखे ,विजेचे दिवे,रेडिओ, टीव्ही बंद करणे.

३) ऊजेची बचत होईल अशा ऊर्जा साधनांचा वापर करणे.

४) सार्वजनिक ठिकाणचे दिवे दिवसा बंद ठेवण्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

५) ऊर्जा साधनांचा काटेकोरपणे वापर करण्याविषयक माहिती सूचना फलकावर लावणे.

६) अपारंपारिक ऊर्जा साधने वापराबाबत जनजागृती करणे.

७) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा शोध घेऊन त्याच्या वापरास चालना देणे.

**पर्यावरण संरक्षणाशी संबंधित दिनविशेष**

| | | |
|---|---|---|
| १ | १४ जानेवारी | भूगोल दिन |
| २ | १४ते३० जानेवारी | प्राणी कल्याण पंधरवडा |
| ३ | २१ मार्च | जागतिक वनीकरण दिन |
| ४ | २२ मार्च् | जागतिक जल दिन |
| ५ | ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन |
| ६ | २२ एप्रिल | जागतिक वसुंधरा दिन |
| ७ | ५ जून | जागतिक पर्यावरण दिन |
| ८ | १ जुलै | कृषि दिन |
| ९ | ६ ऑगस्ट | हिरोशिमा दिन |
| १० | १६ सप्टेंबर | जागतिक ओझोन दिन |
| ११ | १ ते ७ ऑक्टोंबर | वन्य जीवन सप्ताह |
| १२ | ४ ऑक्टोबर | विश्व प्राण्ी दिन |
| १३ | २४ नोव्हेबर | जागतिक जैविक विविधता संवर्धन दिन |
| १४ | २ डिसेबर | भोपाळ दुर्घटना दिन |
| १५ | १४ डिसेबर | ऊर्जा दिन |
| १६ | २९ डिसेंबर | आंतराष्ट्रीय औष्णिक विविधता दिन |

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**पर्यावरण संरक्षण /संरक्षाणाशी संबंधित घोषवाक्य :**

१. झाडे-झाडे लावूया ,रुसल्या पावसाला हसवू या ।
२. सुखी आयुष्याची शिदोरी,वृक्ष लावा दारोदारी ।
३. निसर्गाचे रक्षण ,आपले संरक्षण ।
४. ऊतु नका ,मातु नका । झाडे लावणे सोडू नका।।
५. स्वच्छता राखा ठिक-ठिकाणी ,आरोग्य येईल घरोघरी।
६. आता आहे एकच ध्यास, प्रदुषणाचा समुळ नाश।
७. एक तरी झाड लावा,सारा देश हिरवा करा।
८. साठवील पाणी, वाचवील पाणी, जगवील पाणी।
९. गप्पी मासे पाळा,हिवताप टाळा।
१०. स्वच्छतेकडुन, समृध्दीकडे।
११. तूळस लावा दारोदारी,आरोग्य नांदिल घरोघरी।
१२. निर्मल ग्राम वाढवी देशाची शान।
१३. प्रदूषणावर बंधन , आरोग्यावर नियंत्रण।
१४. कावळा करतो काव काव,माणसा-माणसा झाडं लाव।
१५. स्वच्छ गाव, सुंदर गाव ,आरोंग्य त्यांचे नाव।
१६. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे , पक्षी ही सुस्वरे आळविती।

**संदर्भसूची :**

**१)** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (२००६) पर्यावरण शिक्षण हस्तपुस्तिका.
**२)** सावंत प्र. (२०१०) पर्यावरण शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन
**३)** शेंडकर, ढगे (२०१२) पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन, सृष्टी प्रकाशन